स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६ वा मजला
नवी मुंबई ४०० ६१४

**स्थायी आदेश क्र. ०१ / २०१६, दिनांक** 30 DEC 2016

विषय:- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालयातील सेवानिवृत्ती वेतनधारकांची निवृत्तीवेतन प्रकरणांची छाननी करणेबाबत.

संदर्भ:-
१. शासन निर्णय शिक्षण व सेवानियोजन विभाग क्र.एसएससी १८८३ / २४२६७ (८९०६) उमा शि-१, दिनांक १५ नोव्हेंबर १९८५.
२. या संचालनालयाचे पत्र क्र. स्था.१८/ब / माध्य.उच्च माध्य.शि.मं./ सेपुपडताळणी / अे.अे.३ / १३१७, दिनांक २०/८/२०१४.
३. विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती यांचे पत्र क्र.अविमं / आस्था /१६४३,दिनांक २३/९/२०१६.
४. विभागीय सचिव, अमरावती विभागीय मंडळ, अमरावती यांचे पत्र क्र.अविमं/ लेखा / २१९३, दिनांक २१/११/२०१६.
५. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं. / पेंन्शन / सेपुप / ८१७७/ १६ /६७, दिनांक २१/११/२०१६.

उपरोक्त संदर्भिय क्र.१ शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे व त्यांचे सर्व विभागीय मंडळांतील कर्मचा-यांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्यात आली असून मंडळ कार्यालयाने कर्मचा-यांच्या तयार केलेल्या निवृत्ती वेतनाच्या कागदपत्रांची छाननी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडून सशुल्क धर्तीने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये संचालनालयाने विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी / पडताळणी या संचालनालयाच्या अधिनस्त संबंधित जिल्हा सहाय्यक संचालक कार्यालय / मुंबई मंडळ यांचेकडून करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत-

१. विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, यांनी त्यांच्या विभागीय मंडळातील सेवानिवृत्त होणा-या अधिकारी / कर्मचा-यांची सेवानिवृत्ती विषयक कागदपत्रे संबंधित अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी ६ महिने अगोदर संचालनालयाने संदर्भ क्र.२ अन्वये निश्चित केलेल्या संबंधित जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय / मुंबई मंडळ यांचेकडे सादर करावीत.
२. जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय / मुंबई मंडळ यांनी प्राप्त सेवानिवृत्ती विषयक कागदपत्रांची ४ महिन्याच्या कालावधीत छाननी करून ती संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास पाठवावी.

३. विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालयांतून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी / कर्मचा-यांना त्यांचे निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळीच अदा होतील याची दक्षता घ्यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

प्रत उचित कार्यवाहीस्तव:-

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
२. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
३. विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, वाशी / पुणे / कोल्हापूर / नाशिक / औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर.
४. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे / कोल्हापूर / नाशिक / औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर